# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 14/02/2020 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर अर्जन नगर, काटोल येथे दिनांक 13/02/2020 चे 16:00 वा. ते 16:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. संजुता मुकेश तागडे, वय 30 वर्ष, रा. अर्जन नगर, काटोल या पती व मुलांसाबत मेटपांजरा येथे गेल्या होत्या. फिर्यादी या परत येऊन पाहिले असता त्यांना घराचा दार अर्धवट सुरू दिसला. त्यामुळे फिर्यादीने बाहेरच लोकांना विचारले की, ''माझ्या घराचा दार कसा उघडा आहे.'' असा आवाज एकताच आरोपी नामे– समीर संतोष सनेश्वर, वय 21 वर्ष, रात्र अर्जुन नगर काटोल हा घरातुन निघुन पळुन गेला. आरोपीने फिर्यादींच्या घरातुन सॅमसंग कंपनीचा मोबाईल व स्टेनोचा मोबाईल असा एकुण कि. 9,000/–रू. तसेच फिर्यादींच्या शेजारी राहणारे दिलीप विठ्ठलराव मांजरेवार यांच्या घरातील चांदीचे चार तोळे तोरडया जोड कि. 1,500/–रू. चा असा एकुण कि. 10,500/–रू. चा मुद्येमाल नमुद आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोसि हवालदार पभुदास दलाल 9823970139 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत तहसिल कार्यालय उमरेड समोर संदिप कांबळे पानठेला येथे दिनांक 13/02/2020 चे 12.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– वसंता कवडू ठाकरे, वय 56 वर्ष, रा. शिवणफळ नाड ता.भिवापुर हे सेंट्रल बॅक ऑफ इंडिया बाय पास रोड उमरेड येथून बॅकेतुन 80,000/–रू. काढुन थैलीत ठेवून तहसिल कार्यालय उमरेड समोर संदिप कांबळे यांच्या पाणठेल्यावर चाहा पिने कामी थांबले होते. दरम्यान फिर्यादीला अंगावरील शर्टावर घाम लागल्याचे दिसल्याने हातातील पैशांची थैली चहाचे टपरी वरील खुर्चीवर ठेवून अंगातील शर्ट काढुन शर्ट पाण्याने धुवत असतांना अज्ञात आरोपीने थैलीत असलेले नगदी 80,000/–रू. व सेंट्रल बॅकचे चेक, बॅक ऑफ इंडियाचे पासबुक व चेक आय.डी.बी.आय बॅकचे पास बुक व चेक, आधार कार्ड व पॅन कार्ड थैली सह चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ गुलाबराव धुर्वे 9130991826 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर